
ISBN-978-81-924997-6-5

# भारतीय इतिहासातील नवीन प्रवाह



संपादक

प्रा. संदिप एन. मिरे

प्रा.सोपानराव जी. पुरनाळे

Scanned by CamScanner

# अनुक्रमाणिका


| अ.नं. | शिर्षक | लेखक | पृष्ठ.क्रं. |
|---|---|---|---|
| १ | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जल व विद्युत विकासातील योगदान | प्रा.डॉ.अंबादास मंजुळकर | ५ |
| २ | आंबेडकरवादी इतिहास लेखनप्रवाह : एक अभ्यास | प्रा.डॉ.महादेव वाघमारे | १९ |
| ३ | पाथर्डी तालुक्यातील काही धार्मिक स्थळांचा स्थानिक इतिहास व परंपरा | प्राचार्य डॉ.एम.के.फसले | २५ |
| ४ | स्थानिक इतिहास : नेवासा नगरी | प्रा.डॉ.वसंतराव शेंडगे | ३० |
| ५ | एकोणिसाव्या शतकातील स्त्रीमुक्ती चळवळीचा उदय : ज्ञानोदय | प्रा.डॉ.उषा विटकर | ३८ |
| ६ | मौखिक इतिहास लेखनप्रवाह | प्रा.डॉ.नाथा मोकाटे | ४२ |
| ७ | स्थानिक इतिहासलेखन | डॉ.भूषण गोविंद फडतरे | ४७ |
| ८ | स्त्रीवादी इतिहासलेखन प्रवाह | प्रा.डॉ.किसनराव अंबाडे | ५३ |
| ९ | महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ | प्रा.डॉ.मिना साळे | ५८ |
| १० | आधुनिक भारतीय इतिहासाची नवीन परिमाणे आणि नव्या दिशा | प्रा.डॉ.राजाराम सोनवणे | ६२ |
| ११ | भारतीय स्वातंत्र्य लढयातील उपेक्षित पाहिली स्त्री क्रांतीकारक राणी चिनम्मा | प्रा.डॉ.होनराव गणेश | ६९ |
| १२ | इतिहास लेखनातील वस्तु निष्ठता : एक चिंतन | प्रा.मरकड एस.व्ही | ७४ |
| १३ | हुतात्मा करवीर चौथे छत्रपती शिवाजी महाराज | प्रा.संदिप मिरे | ७८ |
| १४ | उपेक्षितांचा इतिहास :— इतिहास लेखनातील एक नवीन प्रवाह | प्रा.कमलाकर घोलप | ८५ |
| १५ | ऐतिहासिक शेवगांव तालुका | प्रा.सोपानराव पुरनाळे | ९० |
| १६ | मीठाच्या सत्याग्रहातील हुतात्म्यांचा इतिहास : दत्ताराम कोयंडे | प्रा.सोमनाथ कदम | ९७ |
| १७ | दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांचा बलूतेदारी पध्दतीस विरोध | प्रा.सतीश दरवडे | १०२ |
| १८ | सबाल्टर्न लेखन प्रवाह आणि इतिहासाची वाटचाल | प्रा.अर्जुन केरकळ | १०७ |
| १९ | स्त्री उन्नतीचा महायोध्दा : डॉ.बाबासाहेब आंबेकर | प्रा. दिलीप गिन्हे | ११२ |
| २० | स्थानिक इतिहास | प्रा.सचिन भाकरे | ११६ |
| २१ | उपेक्षित घिसाडी समाज : एक ऐतिहासिक अभ्यास | श्री.किरण पवार | ११८ |
| २२ | स्त्री शौर्याची गाथा : आहिल्याबाई होळकर | श्री.संतोष खोलासे | १२५ |


Scanned by CamScanner

ISBN-978-81-924997-6-5

# २) आंबेडकरवादी इतिहास लेखनप्रवाह :– एक अभ्यास

प्रा.डॉ.महादेव वाघमारे
श्रीशिवछत्रपती कॉलेज,
जुन्नर. पुणे.

---

भारतीय इतिहासाचे स्वरूप वरचेवर बदलत आहे. इतिहास अभ्यासाच्या विविध विद्याशाखा जन्माला येत आहेत. ही निश्चितच चांगली बाब आहे. स्थानिक इतिहास, वंचितांचा इतिहास, मौखिक इतिहास, स्त्रिवादी इतिहास याप्रमाणेच आंबेडकरवादी इतिहास लेखनप्रवाह देखील उदयाला आला आहे. म्हणूनच इतिहासाच्या या राज्यस्तरीय चर्चासत्राला त्याची दखल घ्यावी लागली आहे. आता एक प्रश्न पडतो की, आंबेडकरवादी इतिहास लेखन प्रवाह म्हणजे काय? आंबेडकरवादी इतिहास लेखनाची आपणास व्याख्या करता येईल काय? निश्चित करता येईल. भारतीय इतिहासात उपेक्षितांची जी उपेक्षा केली आहे. त्या उपेक्षितांच्या इतिहासाला आपल्या लेखणीतून वाचा फोडून बहुजनांना स्वतःच्या अस्तित्वाची जाणिव करुन देणारे आणि विधायक मार्गाने संघर्ष करून सत्तेपर्यत पोहचविणारे लिखाण म्हणजे आंबेडकरवादी लिखाण होय. अशी सर्वसाधारण व्याख्या करता येईल. प्राचीन भारताच्या इतिहासाचे आणि धर्मग्रथांचे खऱ्या अर्थाने उत्खनन करुन त्यातील सत्य – असत्य बाहेर काढण्याचे काम आंबेडकरवादी विचारप्रवाह करीत आहे. म्हणून भारतीय इतिहास लेखन प्रवाहात आंबेडकरवादी इतिहासप्रवाह महत्वाचा आहे. पारंपारिक इतिहास लेखणीला बाजुला सारुन स्वतःची नवीन अशी इतिहासाची मांडणी करणारा वर्ग समाजात उदयाला आला. त्यांनी इतिहासाच्या पुर्नलेखनाला सुरूवात केली. त्याचा आरंभ प्रथमतः डॉ.आंबेडकरांनी केला. म्हणून त्यांच्या विचाराची कास धरून इतिहास लेखन पुढे पुढे जात आहे.

डॉ.आंबेडकरांनी ९ मे १९१६ रोजी वयाच्या २६व्या वर्षीच कोलंबिया विद्यापीठात मानववंशशास्त्राच्या परिषदेत 'भारतातील जाती, त्यांची घडण, उत्पत्ती व प्रसार' हा भारतीय जातीसंबंधीचा संशोधनात्मक निबंध वाचला. यामध्ये त्यांनी एका विशिष्ट अशा जातीवर प्रकाश न टाकता भारतीय समाजरचनेची छाननी अत्यंत शास्त्रीय दृष्टिकोनातून केली आहे. त्यांनी हा विषय राष्ट्रीय दृष्टिकोनातून निवडला होता हे लक्षात घेतले पाहिजे. त्यांनी लिहिलेल्या विविध ग्रंथातूनच आंबेडकरवादी इतिहास लेखन जन्माला आले आहे. त्यांनी मांडलेल्या विविध सिध्दांताचे जेव्हा वाचन होऊ लागेल तेव्हा इतिहासलेखनाला वेगळे अंकुर फुटू लागले त्यालाच आंबेडकरवादी प्रवाह म्हणतात. डॉ.आंबेडकराच्या इतिहास लेखन प्रवाहात बौध्द, कबीर, फुले यांचेच विचार सापडतील म्हणूनच आंबेडकरवादामध्ये



Scanned by CamScanner

संघर्षाचे तत्व आहे. आर्थिक व सामाजिक विकासाचा मार्ग आहे. धर्माच्या शुध्दीकरणाचे बीज आहे. याच आंबेडकरवादी विचाराचे प्रचारक व प्रवाहक आधुनिक काळातले काही इतिहास लेखक आहेत.

इतिहासात शेवटचा शब्द नसतो. या म्हणण्याप्रमाणे पारंपारिक पध्दतीने इतिहासाचे लेखन न करता नवीन पध्दतीने इतिहासाची पुर्नमांडणी करणारा लेखकवर्ग उदयाला आला. यामध्ये स्वतः डॉ. आंबेडकर, वि.भि.कोलते, दिनकरराव जवळकर, का.शि.संकाये, भारस्करराव जाधव, डॉ.के.जमनादास, एच.एल.कोसारे, वसंत धावरे, डॉ.महादेव लभाने, शेषेराव मोरे, विश्वास रूके, इतिहासचार्य वि.का. राजवाडे, ज्ञानकोशकार श्री.व्यं.केतकर, कॉ.शरद पाटील, राहुल संस्कृतायन, प्रबोधनकार ठाकरे, स्त्रिवादाचा बुलंद आवाज विद्युत भागवत, डॉ.उमेश बगाडे अशी कितीतरी विद्वांनाची नावे घेता येतील. या लेखकांनी इतिहासाच्या सुक्ष्मतेकडून विज्ञानवादी दृष्टिकोनाकडे जास्त लक्ष दिले आहे.

आंबेडकरवादामध्ये बौध्द तत्वज्ञान असल्याने समाजाला संघटित होण्याचे ते नेहमी सांगतात ते म्हणतात तुम्ही मुळचे दलित नसून बौध्द आहात. दलित आणि हिंदू या संज्ञामध्ये जातीव्यवस्था दडलेली आहे. बौध्द संस्कृतीचा लोप व्हावा म्हणून तुम्हाला ही संज्ञा दिली आहे, ती लादलेली आहे.

'प्राचीन भारतातील नाग' हे पुस्तक अत्यंत महत्वाचे आहे. त्यांनी आपल्या या ग्रंथामध्ये महार हे नागवंशीय होते. महाराष्ट्र महारांचा देश कसा आहे, महार व मराठा या जाती एकाच वंशाच्या कशा? महार राज्यकर्ते कोणते? रामकृष्ण भांडारकरांच्या मृत आहार करणारे ते महार या उत्पत्तीची अक्षरशः चिरफाड केली आहे.

डॉ.के.जमनादास या विद्वानाने सध्याच्या तिरूपती बालाजीच्या मंदीरावर प्रकाश टाकला आहे. या ग्रंथामध्ये वेगवेगळया मंदिरांचा इतिहास सांगितला आहे. यामध्ये जगन्नाथपुरीचे मंदिर, पंढरपुरच्या विठ्ठलाचे मंदिर, केरळमधील अय्यपाचे मंदिर, तिरुपतीचे मंदिर अशा विविध मंदिरांचा शोध होवून ही सर्व मंदिरे बौध्द स्थळेच कशी आहेत हे साधार स्पष्ट केले आहे.

'विश्वधर्म' या गाजलेल्या ग्रंथाचे लेखक का.शि.संकाये यांनीही आंबेडकरवादी विचारप्रवाह पुढे पुढे नेला आहे. त्यांनी या ग्रंथामध्ये जगाला सावरून धरणारा नि जगाला विज्ञानवाद शिकवणारा बौध्द धर्मच कसा योग्य आहे हे पटवून दिले आहे. त्यांनी सनातन धर्मग्रंथाची मानवघातकी शिकवण, बौध्द धर्म व वैदिक धर्म – तुलनात्मक विचार यासारखे विविध ग्रंथ लिहून बौध्द विचार तथा आंबेडकरवादी प्रवाह पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी वैदिक धर्म शत्रूवत तर बौध्द धर्म मित्रवत हा विचार पटवून देवून यज्ञयोगाच्या नावाखाली किती मोठया प्रमाणात मांसाहार केला जात होता हे साधार स्पष्ट केलं आहे.



Scanned by CamScanner

अशाप्रकारे लिखाण करुन प्रचलित असणाऱ्या इतिहासातील गोष्टींना जबर धक्का दिला आहे हे आपणांस मान्य करावे लागेल. संत तुकारामावर नवा प्रकाश टाकण्याचे अत्यंत महत्वाचे काम डॉ.महादेव लुभाने या लेखकाने केले आहे. संत तुकारामावर आतापर्यंत डॉ.सदानंद मोरे पासून ते डॉ.आ.ह.साळुंखे पर्यंत बऱ्याच लेखकांनी पुस्तके लिहिली आहेत. परंतु डॉ.महादेव लुभाने यांनी जो ग्रंथ लिहिला आहे. तो फारच अभ्यासनिय आहे. त्यांनी 'संत तुकारामावर बौध्द धर्माचा प्रभाव' हा ग्रंथ लिहून बुध्द धम्मातील मुळ वचने सांगून त्यांचा प्रभाव संत तुकारामाच्या अभंगामध्ये कसा दिसून येतो आहे हे फारच सुंदररित्या पटवून दिले आहे. यामध्ये त्यांनी संत तुकारामाच्या चरित्राचा विचार न करता ते विज्ञानवादी कसे होते, समतेचे कसे प्रवाहक कसे प्रवाहक होते हे साधार पटवून दिले आहे. त्यांच्या लिखाणाला तुकाराम गाथाच का म्हटलेले आहे. कारण त्यांनी आपल्या अभंगातून बौध्द धम्माचाच विचार सांगितला आहे. आणि गाथा हा शब्दही बौध्द वाङ्:मयातील आहे. त्यामुळे संत तुकारामाचा अभ्यास करतांना इतर संतापेक्षा त्यांचे वेगळेपण कसे होते हे त्यांनी पटवून दिले आहे.

याच पंथातील दुसरे लेखक म्हणजे मा.भास्करराव जाधव होय. यांनी वाल्मीकी रामायणाचा आधार घेवून 'रामायणावर नवा प्रकाश' नावाचा अत्यंत सुंदर ग्रंथ लिहिला आहे. सदर ग्रंथामध्ये वाल्मिकी रामायणातील श्लोकांचा आधार घेवून रामाचा सर्व इतिहास लिहीला आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी बंधुप्रेम कसे असावे तर राम भरता सारखे असावे या प्रचलित रूढीलाच जबर धक्का दिला आहे. हे सागताना रामायणातील भावा भावाच्या जोडया सांगितल्या आहेत. रामाची सेवा करणारा लक्ष्मण तर भरताची सेवा करणारा शत्रुघ्न होय, हे असे का? असा महत्वपूर्ण प्रश्न निर्माण करून त्याचे उत्तर देताना ते म्हणतात की दशरथाला असणाऱ्या तीन बायकांपैकी सुमित्रा ही राजकन्या नसून हलक्या कुळातील होती. कौशल्या व कैकयी हया राजकुळातील होत्या. तेंव्हा राजकुळातील राजकन्याच्या पोटी जन्मलेल्या राम व भरत यांची सेवा हलक्या कुळात जन्मलेल्या लक्ष्मण व शत्रुघ्न या भावांनी केली पाहिजे असा उच्च निचवाद रामायण शिकवते. त्यामुळे रामाच्या रूढ असलेल्या प्रतिमेला जाधवांनी जबरदस्त धक्का दिला आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी राम, वाली, हनुमान, बिभिषण यांच्याबाबतीत अत्यंत परखड व स्पष्ट मते मांडून या देशाला हे सर्व गुलामगिरीत नेणारे आहेत हे वाल्मिकी रामायणाच्याच आधारे स्पष्ट केले आहे.

भास्करराव जाधवांप्रमाणे पेरियार रामास्वामी यांनीही द रामायण 'अ टु रिडींग' या ग्रंथामध्ये रामासंबंधीचा अत्यंत परखड व ठोस विचार मांडला आहे ते म्हणतात रामायण – महाभारत हे ग्रंथ द्रविडांची माणुसकी नष्ट करण्यास, त्यांच्या बौध्दिक शक्ती कमकुवत करण्यास, त्यांचा स्वाभिमान नेहमीकरिता पायदळी तुडविण्यास निर्मिले गेले आहेत.अशा रितीने इतिहासाला एक नवी दृष्टि देण्याचे



Scanned by CamScanner

काम उपरोक्त लेखकांनी केले आहे. इतिहासातील सत्य शोधण्याचे काम इतिहासचार्य वि.का.राजवाडे यांनी 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' या ग्रंथात केले आहे. डॉ.रूपा कुलकर्णी बोधी यांनी वैदिक धर्म गोहत्या व मांसाहार या ग्रंथामध्ये यज्ञयोगाचे निमित्त करून किती मोठया प्रमाणावर गोहत्या आणि मांसाहार होत होता. याचे अत्यंत खोलात जावून संशोधन केले आहे. आर.एस.शर्मांनी देखील ऋषिमुनी किती मोठयाप्रमाणात गोहत्या व मांसाहार करित होते हे आपल्या 'प्राचीन भारतीय समाजरचनेतील शुद्राचे स्थान' या ग्रंथामध्ये साधार स्पष्ट करतांना दिसतात.

म्हणजे पारंपारिक पध्दतीच्या विचारातील हवाच या लेखकांनी काढली आहे. मराठयांच्या इतिहासाच्या बाबत विचार केला तर त्यातही नवनवीन माहिती पुढे येतांना दिसते. शिवरायांचा लष्करी इतिहास अभ्यासताना समरोत्सवात अशी माहिती सापडते की शिवरायांची सैन्य संख्या सत्तर हजार होती. त्यामध्ये तीस हजार कोळी, मराठा दहा हजार तर महार व इतर तीस हजार अशी जातवार संख्या सापडते.

शिवरायांचे अजिक्य गड बांधणारे वडार जातीची लोक होती. वडार या मुळ कन्नड शब्दाचा अर्थ अभियंता असा होतो. त्यामुळे स्वराज्य उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा होता हे आता स्पष्ट झाले आहे. एवढेच काय शिवरायांच्या स्वराज्यासाठी विशिष्ट प्रकारचे रसायन तयार करून भगवे निशाण तयार करून देणाऱ्या महादनाक वल्द राजनाक या वतनदाराचे नाव शोधण्यापर्यंत इतिहास लेख्र सुक्ष्म अभ्यास करून इतिहास उजेडात आणित आहेत ही अत्यंत उल्लेखनिय बाब आहे. याशिवाय अजून कितीतरी लोकांच्या पुस्तकांचा संदर्भ घेता येईल परंतु शोधनिबंध वाढतच जाईल पण शोध थांबला जाणार नाही हे लक्षात घेऊन मोजक्या उदाहरणासह आंबेडकरवादी प्रवाह समाजाला नवी दिशा देण्याचा कसा प्रयत्न करतो आहे, एवढेच लक्षात घ्यावे.

आता आपणांस प्रश्न पडू शकतो की, उपरोक्त लेखकांनी मांडलेला इतिहास सबाल्टर्न इतिहासामध्ये मोडत नाही काय? प्रश्न रास्त आहे. १९८० मध्ये इटालियन विचारवंत ॲन्टिनिओ ग्रामचिनी मानव, मानवी श्रम आणि त्याचा भौतिक विकास या गोष्टी केंद्रिभूत मानून विकासप्रक्रियेमध्ये ज्याने प्रत्यक्ष श्रम केले. आपल्याकडील कला दाखविली त्यांचा इतिहास लिहावा असा जो सिध्दांत मांडला सबाल्टर्न इतिहास असे म्हणतात. हे खरे असले तरी आंबेडकरवाद जरा निराळा आहे. ग्रामचीचा सिध्दांत सामाजिक समता प्रस्थापित करण्याची जबाबदारी घेत नाही. आंबेडकरवाद उघड उघड समता प्रस्थापित करण्याची जबाबदारी होती. ग्रामची संघर्ष करण्यास प्रवृत्त करीत असला तरी सत्ता हस्तगस्त करण्यास सांगत नाही. म्हणजे सबाल्टर्नवाल्यांनी सबाल्टर्न म्हणूनच जन्मावे, जगावे व त्यातच निवृत्त



Scanned by CamScanner

व्हावे असा आशय निघतो पण आंबेडकरवाद मात्र वंचितांचा इतिहास तर मांडतोच पण एवढयावरच न थांबता संघर्ष करुन सत्ताधारी बनण्याचा संदेशही देतो हा फरक महत्वाचा आहे.

उपरोक्त लेखकांनी जी मांडणी ग्रंथात केली आहे त्याचा मुळपाया आंबेडकरवाद आहे. आंबेडकरांच्या ग्रंथसंपदेमध्ये जे लिखाण आलेले आहे. त्याचाच धागा पकडून समस्त लेखकांनी विचारवंतानी इतिहासाचा शोध घेतला आहे. भारतामध्ये सामाजिक, धार्मिक, आर्थिक याही चळवळी होत आहेत त्या आंबेडकरवादाच्या भक्कम पायावर उभ्या आहेत त्यांची नाळ आंबेडकरवादाशी जोडली आहे. कारण आंबेडकरवाद कोणत्या जातीवर, धर्मावर उभा नसून त्याचा भक्कम पाया म्हणजे राष्ट्रवाद आहे हे विसरुन चालणार नाही.



Scanned by CamScanner

ISBN-978-81-924997-6-5

# परिचय



प्रा. पुरनाळे सोपानराव गोपीनाथ
एम.ए.(इतिहास) एम.फिल.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे
न्यू आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव जि. अहमदनगर येथे इतिहास विभाग प्रमुख म्हणून कार्यरत.

इतिहास विषयाच्या अध्यापनाचा व्याख्याता म्हणून पदवीस्तर ३४ वर्षे व पदव्युत्तर विभागासाठी २६ वर्षे अनुभव.

पुणे विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे २००१-०५ या कालावधीत सदस्य व २००३-०५ या कालावधीत अध्यक्ष होते.

तसेच पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य म्हणुन कामकाज. २००३-०५ या कालावधीत मानस, निति व समाजविज्ञान शाखेचे सभासद म्हणून कामकाज.

मागील १० वर्षापासून शेवगाव तालुका दूध उत्पादक पतसंस्था लि.चे अध्यक्ष म्हणून कार्यरत.

विद्यापीठ अनुदान आयोगाने ऐतिहासिक शेवगाव तालुका सर्वेक्षण या विषयाच्या लघुशोध प्रकल्पाला मान्यता.

विविध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य पातळीवरील चर्चासत्रामध्ये उद्घाटक, अध्यक्ष व विषयतज्ञ व्यक्ती म्हणून सहभाग, तसेच शोधनिबंध प्रकाशित.



प्रा. मिरे संदिप नामदेवराव
एम.ए.(इतिहास) एम.फिल.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे
न्यू आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज शेवगाव येथे इतिहास विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत

पदवी व पदव्युत्तर स्तरावर पाच वर्षे अध्यापनाचा अनुभव.

राजवाडे संशोधन मडळाचे संग्रहित शस्त्रास्त्रे-विश्लेषणात्मक अध्ययन या विषयावरील ग्रंथ प्रकाशित-२०१३.

विद्यापीठ अनुदान आयोगाने करवीर चौथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन व कार्य या विषयावर लघुशोध प्रकल्पाला मान्यता.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्यरत.

विविध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य पातळीवरील चर्चासत्रात शोधनिबंध प्रकाशित.

Email : sandeepmire@gmail.com



प्राचार्य डॉ. एल.एस. मतकर
एम.एस्सी.एल.एल.बी.,पीएच.डी.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे
न्यू आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज शेवगाव येथे मागील पाच वर्षांपासून प्राचार्य म्हणून कार्यरत.

पुणे विद्यापीठाकडून प्राणीशास्त्र विषयांतर्गत १९९६ साली विद्यावाचस्पती (पीएच.डी.) प्रदान.

फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे येथे प्राणीशास्त्र विषयाचे सहयोगी प्राध्यापक म्हणून १५ वर्षे अध्यापनाचा अनुभव.

२५ वर्षे संशोधन क्षेत्रात कार्यरत, तसेच नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल मध्ये आठ शोधनिबंध प्रकाशित

यु.जी.सी. व बी.सी.यु.डी. अंतर्गत सात लघुशोध प्रकल्प पुर्ण.

Email : drlanmanmatkar@yahoo.co.in

प्रकाशन-
शब्दश्री प्रकाशन, बोडकेनगर, जुन्नर, जि.पुणे मो.९८९०६८६५२१

Scanned by CamScanner